# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि.२०/०४/२०१८.

## प्रेस नोट.

## पाहिजे असलेला आरोपी गुन्हे शाखेच्या जाळ्यात

दि.२०/०४/२०१८- काल दि.१९/०४/२०१८ रोजी गुन्हे शाखेने पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे दाखल गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी नामे शशि राजू दानवे रा.विष्णू नगर औरंगाबाद यास अटक केली आहे.

गुन्हे शाखेचे सहा पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे यांनी अधिक माहिती देताना कळविले कि, गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक योगेश धोंडे व स्टाफ हे पोलीस आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली कि, पोलीस स्टेशन जवाहरनगर येथील गु.र.न ५८/२०१८ कलम ३५४(अ),५०४,५०६, भा.द.वि सह.कलम ७,८ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२, मधील पाहिजे असलेला आरोपी हा बाबा पेट्रोल पंप येथे येणार आहे. मिळालेल्या बातमीची शहानिशा करून बाबा पेट्रोल पंप येथे गुन्हे शाखेने सापळा लावून सदर गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपीस मोठ्या शिताफीने पकडले. त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शशिकांत उर्फ सोनू पिता राजू दानवे वय ३० वर्ष रा.जवाहर कॉलनी विष्णूनगर घर क्रमांक VH/८१ औरंगाबाद असे सांगितले. सदर आरोपीस पुढील तपासकामी जवाहरनगर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त श्री.मिलींद भारंबे, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) डॉ.दिपाली धाटे-घाडगे, सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. रामेश्वर थोरात, सहा. पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक योगेश धोंडे, पोह/रामदास गायकवाड, संतोष सोनवणे, पोना/बापूराव बावस्कर, पोकॉ/आनंद वाहूळ, रितेश जाधव यांनी केली आहे.

SD/-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर